प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**मराठी विभाग**

लोकमत

# सामाजिक बहिरेपण भविष्यासाठी घातक : दौंडकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असुनही समाज संकुचित होत चालला आहे. स्वच्छ अभियानाच्या झाडूने माणसाच्या मनातील जातीपातीचा, अंधश्रद्धेचा, दांभिकतेचा कचरा कसा झाडायचा हा प्रश्न गंभीर असून वाढते सामाजिक बहिरेपण समाजारोग्यासाठी घातक असल्याचे प्रतिपादन कवी भरत दौंडकर यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात 'माता, माती व संस्कृती' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर, कला व वाणिज्य शाखेतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



**महाविद्यालयातील मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन कवी भरत दौंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

भरत दौंडकर यांनी बोलताना प्रत्येकाने मातीशी इमान ठेवायला हवे असे सांगून शेती विकून मौज करणाऱ्यांवर आधारित 'गोफ' कविता सादर केली. गुंठा गुंठा जमीन विकून गोफ गळ्यात आला असला, तरी उद्या एक एक प्लेट माती हुंगायला रक्त डोळ्यात येईल, या वास्तवाची त्यांनी जाणीव करुन दिली. नोटाबंदीमुळे सामान्यांचे नुकसानच झाले असून नोटांचे रंग बदलले परंतु गरिबीचा रंग तसाच असल्याची अस्वस्थता त्यांनी मांडली.

विचारवंतांच्या हत्येबद्दल चिंता व्यक्त करताना अजून किती जणांच्या रक्ताने आपली माती मलीन होणार आहे. दाभोलकरांच्या खुनाची केस नक्की उलगडणार आहे, की तुकारामांसारखी वैकुंठात विलीन होणार आहे, असा प्रश्न व्यवस्थेला विचारुन 'स्वप्नांचे खून' ही कविता सादर केली.

विद्यार्थ्यांकडे जर प्रतिभा आणि कल्पनाशक्तीच्या साह्याने नेमक्या शब्दांत वास्तवाचे नेटके दर्शन घडविण्याची क्षमता असेल तर कवितेचं क्षेत्र करिअर म्हणून निवडायला हवे, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी तर आभार प्रा. वर्षा कांबळे यांनी मानले.

सकाळ
पुणे, सोमवार,
२६ फेब्रुवारी २०१८



# सामाजिक बहिरेपण घातक : दौंडकर

राजगुरुनगर, ता. २५ : "माणसाच्या मनातील जातीपातीचा, अंधश्रद्धेचा, दांभिकतेचा कचरा वाढत चालला आहे. महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असूनही समाज संकुचित होत चालला आहे," अशी खंत कवी भरत दौंडकर यांनी व्यक्त केली.

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात माता, माती व संस्कृती या विषयावर बोलत होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर उपस्थित होते.

ते म्हणाले, "विचारवंतांच्या हत्या चिंतित करणाऱ्या आहेत. अजून किती जणांच्या रक्ताने आपली माती मलिन होणार आहे? वाढते सामाजिक बहिरेपण समाजस्वास्थ्यासाठी घातक आहे. मातीशी इमान ठेवायला हवे."

माझी कविता वाङ्मयीन मूल्यांपेक्षा मानवी मूल्यांना महत्त्व देणारी असल्याने सामान्यांच्या वेदना कवितेतून मांडतो, असे सांगून त्यांनी 'गुंठा गुंठा जमीन विकून गोफ आताच गळ्यात, तरी उद्या एक एक प्लेट माती हॉटेलला रक्त येईल ढोसायला' ही शेती विकून मौज करणाऱ्यांवर आघात करणारी 'गोफ' कविता त्यांनी सादर केली.

"मराठी भाषा हा फक्त अभिमानाचा विषय न होता, ती ज्ञानभाषा होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे," असे प्राचार्य एस. बी. पाटील यांनी सांगितले.

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांच्या 'लोकजागर' नावाच्या संपादित भित्तिपत्रकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वर्षा कोकाटे यांनी आभार मानले.



राजगुरुनगर येथे 'लोकजागर' विशेषांकाचे प्रकाशन करताना मान्यवर.

# वाढते सामाजिक बहिरेपण समाजारोग्यासाठी घातक

## कवी भरत दौंडकर यांचे प्रतिपादन

राजगुरुनगर : प्रतिनिधी

महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असूनही समाज संकुचित होत चालला आहे. स्वत:च्या अभिमानाच्या झापडे लावल्यामुळे मनातील जातीपातीचा, अंधश्रद्धेचा, धर्मिकतेचा कचरा कसा झाडायचा हा प्रश्न गंभीर असून, वाढते सामाजिक बहिरेपण समाजारोग्यासाठी घातक असल्याचे प्रतिपादन कवी भरत दौंडकर यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात माती व संस्कृती या विषयावर बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, विद्यापीठ प्रतिनिधी हरिभाऊ खळदकर, कला व वाणिज्य शाखेतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

भरत दौंडकर यांनी प्रत्येकाने मातीशी इमान ठेवायला हवे, असे सांगून शेती विकून मौज करणाऱ्यांवर आधारित 'गोफ' कविता सादर केली. गुंठा गुंठा जमीन विकून मौज एकदाच आता असता तरी उद्या एक एक प्लॉट मातीशी इमानाला एक दिवसात येईल, या वास्तवाची त्यांनी जाणीव करून दिली.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी मराठी विभाग सातत्याने भाषा व वाचन संस्कृतीच्या विकासासाठी करीत असलेल्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त करून मराठी भाषा हा फक्त अभिमानाचा विषय न होता ती ज्ञानभाषा होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज व्यक्त केली. मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले. प्रा. वर्षा कांबळे यांनी आभार मानले.



केसरी पुणे, २६ फेब्रुवारी २०१८ ३

## वाढते सामाजिक बहिरेपण सामाजिक आरोग्यासाठी घातक : दौंडकर

राजगुरुनगर, (वार्ताहर) : महाराष्ट्राला प्रबोधनाची मोठी परंपरा असूनही समाज संकुचित होत चालला आहे. स्वच्छ अभियानाच्या झाडूने माणसाच्या मनातील जातीपातीचा, अंधश्रद्धेचा, दांभिकतेचा कचरा कसा झाडायचा हा प्रश्न गंभीर असून वाढते सामाजिक बहिरेपण समाजारोग्यासाठी घातक असल्याचे प्रतिपादन कवी भरत दौंडकर यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या कार्यक्रमात 'माता, माती व संस्कृती' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, विद्यापीठ प्रतिनिधी हरिप्रसाद खळदकर, कला व वाणिज्य शाखेतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

दौंडकर यांनी प्रत्येकाने मातीशी इमान ठेवायला हवे, असे सांगून शेती विकून मौज करणाऱ्यांवर आधारित 'गोफ' कविता सादर केली. नोटबंदीमुळे सामान्यांचे नुकसानच झाले असून नोटांचे रंग बदलले परंतु गरिबीचा रंग तसाच असल्याची अस्वस्थता मांडली. विचारवंतांच्या हत्येबद्दल चिंता व्यक्त करताना अजून किती जणांच्या रक्ताने आपली माती मलीन होणार आहे. दाभोलकरांच्या खुनाची केस नक्की उलगडणार आहे की तुकारामांसारखी वैकुंठात विलीन होणार आहे, असा प्रश्न व्यवस्थेला विचारून 'स्वप्नांचे खून' ही कविता सादर केली.

दरम्यान मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या गावातून संकलित केलेल्या लोकगीतांचा 'लोकजागर' नावाच्या संपादित विशेषांकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी केला. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुरे यांनी तर आभार प्रा. वर्षा कांबळे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख